1045

**निवडणुक महत्वाचे**

**आदेश**

क्रमांक/अका-1/नपाप्र/कावि/ /18
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ
दिनांकः 27.08.2018.

**वाचा**:- मा.राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचे पत्र क्रं./रानिआ/नप2018/प्रं.क्र.12 /का-6दिनांक 08.08.2018.

**//००//**

ज्याअर्थी यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद नेरनबाबपुरच्या प्रारुप प्रभाग रचनेस संदर्भीय आदेशानुसार जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी नगरपरिषद नेरनबाबपुरची नागरी सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील स्त्रीयांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा, नागरीकांच्या मागासवर्गासाठी (त्यातील स्त्री आरक्षणासह) राखीव ठेवावयाच्या जागा व उर्वरीत स्त्रीयांसाठी ठेवावयाच्या जागा यांचे आरक्षण निश्चित करावे व ही सोडत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली करण्यांत यावी असे आदेशीत केले आहे.

त्याअर्थी नगरपरिषद नेरनबाबपुरच्या वरील प्रमाणे प्रभागरचना, आरक्षण व सोडत ईत्यादी पासून अंतीम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहिवर नियंत्रण ठेवण्याकरीता खालील प्रमाणे उप-विभागीय अधिकारी यांना मी याव्दारे प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्रं. | नगरपरिषदेचे नाव | नगरपंचायतीचा वर्ग | नियुक्त प्राधिकृत अधिकारी | सभा घेण्याचे ठीकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | नेरनबाबपुर | क | उपविभागीय अधिकारी , दारव्हा . | नगरपरिषद सभागृह ,<br>न.प. नेर नबाबपुर. |

उपरोक्त अधिकारी यांनी , राज्य निवडणुक आयोगाचे वरील वाचामधील पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करावे व आरक्षणाची सोडत काढण्याकरीता दिनांक 31.08.2018 (शुक्रवार) रोजी सकाळी 11.00 वाजेपासून नगरपरिषद सभागृह , न.प. नेर नबाबपुर. येथे सभा आयोजित करावी. सोडतीच्या वेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा सोडतीसाठी येणा-या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा तसेच प्रत्येक प्रभागाच्या सोडतीच्या आधी त्या प्रभागाचा क्रमांक व त्यांच्या चर्तुसिमा जाहीर कराव्यात त्याच प्रमाणे सोडतीसाठी फिरणारा पारदर्शक ड्रम वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्यांचा आकार १५ सेंमी.X १५ सेंमी. पेक्षा जास्त नसावा चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरून दिसणार नाही याची दक्षता घ्यावी त्यावर लावण्यात येणारे रबर बॅंड एकाच रंगाचे असावे. शक्यतोवर सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही.वर (विनामुल्य) करावे. तसेच सोडतीपूर्वी दिनांक 30.08.2018 रोजी सोडतीची रंगीत तालीम फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत घेण्यात यावी.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**

## प्रेस-नोट

### नोटीस

यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद नेर-नबाबपुर मधील, नगरपरिषद क्षेत्रातील सर्व नागरिकांना सूचित करण्यांत येते की, नगरपरिषद नेर नबाबपुरच्या होणा-या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरीता प्रभागाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत दिनांक 31.08.2018 (शुक्रवार) रोजी सकाळी 11.00 वाजेपासून नगरपरिषद सभागृह , नेर नबाबपुर येथे काढण्यांत येईल. या सोडतीमध्ये अनुसूचित जातीच्या महिला,अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला यासाठी आरक्षण निश्चित करण्यांत येईल. या सोडतीकरीता खालील अधिकारी यांना प्राधिकृत करण्यांत आले आहे.

| अ.क्रं. | नगरपरिषदेचे नाव | नगरपंचायतीचा वर्ग | नियुक्त प्राधिकृत अधिकारी | सभा घेण्याचे ठीकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | नेर नबाबपुर | क | उपविभागीय अधिकारी , दारव्हा . | नगरपरिषद सभागृह ,<br>न.प. नेर नबाबपुर. |

जिल्हाधिकारी यवतमाळ

क्रमांक/अका-1 /नपाप्र/कावि/ 1046 /18
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ
दिनांकः- 23 .08.2018.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,यवतमाळ यांना तात्काळ प्रसिध्दीचे उचित कार्यवाही करीता अग्रेषित सदर प्रेसनोट दिनांक 28.08.2018 (मंगळवार) रोजीचे स्थानिक व विभागीय वृत्तपत्रातून व्यापक प्रसिध्दी द्यावी व वृत्तपत्रांची कात्रणे रेकॉर्डकरीता या कार्यालयास सादर करावी.

जिल्हाधिकारी यवतमाळ